# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२३३
२५६०१२०९

फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ernet.in
e-mail : coe@unipune.ernet.in

परीक्षा—गोदाम/२०१०/९८

दिनांक २८ जून, २०१०

**महत्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व सलंग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
( विद्यापीठ परीक्षांचे महाविद्यालयातील केंद्र )

**विषय :— ऑक्टो./नोव्हें. २०१० मध्ये घेण्यात येणा—या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक साहित्याच्या मागणीबाबत.**

महोदय,

विद्यापीठ परीक्षा मंडळाने ऑक्टो./नोव्हें. २०१० मध्ये विविध परीक्षांचे आयोजन केलेले असून यासंबंधीचे परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासोबत परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालयांचे नांव असलेले स्वतंत्र परिपत्रक ही उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून मान्यता दिली असल्याची खातरजमा करुन घेण्यात यावी.

आपल्या महाविद्यालयास **ऑक्टो./नोव्हें. २०१० मध्ये होणा—या परीक्षांसाठी** परीक्षा केंद्र म्हणून मान्यता दिलेली असल्यास सदर परीक्षेसाठी आपणांस आवश्यक असलेल्या साहित्याची / स्टेशनरीची मागणी ***सोबतच्या तक्त्यामध्ये भरुन मंगळवार दिनांक २० जुलै २०१० पूर्वी विद्यापीठ गोदाम विभागात पोहोचेल*** अशा पध्दतीने पाठविण्यांत यावी.

मार्च/एप्रिल २०१० मध्ये आपणांस विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वितरीत करण्यात आलेल्या स्टेशनरीपैकी काही स्टेशनरी शिल्लक असल्यास त्या स्टेशनरीचा प्रथम ऑक्टो./नोव्हें. २०१० च्या परीक्षांसाठी उपयोग करण्यात यावा. यापूर्वीची अत्यंत जुनी व जीर्ण झालेली स्टेशनरी वापरण्यात येऊ नये व अशी स्टेशनरी अथवा परीक्षेचे साहित्य आपल्याकडे शिल्लक असल्यास त्यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयाकडे स्वतंत्र पत्रान्वये कळविण्यात यावी म्हणजे ती घेऊन जाण्याची व्यवस्था करता येऊ शकेल. यासंबंधीची माहिती विद्यापीठ कार्यालयास न कळविल्यास ती उचलून घेऊन जाण्याची जबाबदारी विद्यापीठ कार्यालयाची राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

..२

मार्च/एप्रिल २०१० मध्ये आपणांस वितरीत करण्यात आलेल्या मुख्य उत्तरपत्रिका अनुक्रमांकानुसार दिलेल्या होत्या आणि ऑक्टो./नोव्हे. २०१० मध्ये होणा–या परीक्षांसाठी देण्यात यावयाच्या मुख्य उत्तरपत्रिका हया सुध्दा अनुक्रमांकानुसार आपणांस देण्यात येणार आहेत. या उत्तरपत्रिका फक्त विद्यापीठ परीक्षांसाठी वापरण्यात याव्यात व शिल्लक राहिलेल्या उत्तरपत्रिकांची नोंद घेऊन त्या व्यवस्थित पुढील परीक्षांसाठी सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात याव्यात. विद्यार्थ्यांस पुरवणी उत्तरपत्रिका हवी असल्यास ही १६ पानी उत्तरपत्रिकाच पुरवणी उत्तरपत्रिका म्हणून वितरीत करण्यात यावी. या दोन्हीही उत्तरपत्रिकांची नोंद संबंधित परीक्षा वर्गाच्या कनिष्ठ पर्यवेक्षकाच्या अहवालामध्ये होईल अशी काळजी घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत खराब झालेली उत्तरपत्रिका अथवा अर्धवट वापरलेली उत्तरपत्रिका रद्दी म्हणून फेकून देण्यात येऊ नये. तर त्याची नोंद घेऊन दप्तरी दाखल करावी. कारण आपल्या महाविद्यालयाच्या नावांवर या सर्व उत्तरपत्रिकांच्या अनुक्रमांकाची नोंद व स्विकारल्याची नोंद विद्यापीठ कार्यालयाकडे करण्यात येत आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्र. १९४/२००६ दिनांक २० मे २००६ अन्वये (Learning Disability) अध्ययन अक्षमता असणा–या विद्यार्थ्यांसाठी रंगीत उत्तरपत्रिका छापून घेण्यात आलेल्या आहेत. तेव्हा अशा विद्यार्थ्यांसाठीची रंगीत उत्तरपत्रिकांची मागणी सोबतच्या तक्त्यामध्येच करावी. **रंगीत उत्तरपत्रिका हया अंध / अपंग विद्यार्थ्यांसाठी वापरल्या जात असल्याचे दिसून येत आहे. तरी त्याचा वापर त्यांच्यासाठी करण्यात येऊ नये.**

त्याचप्रमाणे परीक्षांचे साहित्य महाविद्यालयाच्या ज्या प्रतिनिधीच्या ताब्यात द्यावयाचे आहे त्या **प्रतिनिधीचे नांव, मोबाईल फोन नंबर**, व कार्यालयाचा फोन नंबर या पत्रासोबत कळविल्यास त्यासंबधी परीक्षेचे साहित्य वितरीत करीत असतांना संपर्क साधण्यास मदत होईल. अन्यथा महाविद्यालयाचे **प्राचार्य अथवा रजिस्टार** यांचा **मोबाईल नंबर** देण्यात यावा ही विनंती.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, **वरील परीक्षेच्या साहित्याची मागणी *तातडीने मंगळवार दिनांक २० जुलै २०१० पूर्वी विद्यापीठ गोदाम विभागास पोहोचेल अशा बेताने* पाठवावी.** ऐनवेळी परीक्षेच्या साहित्याची मागणी केल्यास ती पुरविणे शक्य होणार नाही व अशा वेळी सदर परीक्षा साहित्य आपणास घेऊन जाण्याची व्यवस्था करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षा आयोजनासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

शि. मो. अहिरे
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी :–

१. मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग,
२. सहायक कुलसचिव, परीक्षा गोदाम कक्ष

**PRIORITY**

**UNIVERSITY OF PUNE**
**Ganeshkhind, Pune-411007.**

Name of the College : ..........................................................................................................

Total No. of Candidates : B.A. + B.Sc. & B.Com., LL.B., B.Ed. ..............................

Appearing for : M.A. + M.Sc. & M.Com., Engineering, Medicine ..............................

Other Examinations ..............................

Grand Total ..............................

| Items | Stationery supplied for Previous exam. | Stationery used for the last Exam. | Balance | Additional Requirements for March/ April/Oct./Nov. 200 Exam. | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1. Main Answer-books | | | | | |
| 2. Practical Answer-books | | | | | |
| 3. Centimeter Graph Shets | | | | | |
| 4. Junior Supervisors report Forms | | | | | |
| 5. Examiners Receipt Forms | | | | | |
| 6. Junior Supervisor's Admit Forms | | | | | |
| 7. Junior Supervisor's Bill Forms | | | | | |
| 8. Attendance Statement of Junior Supervisors | | | | | |
| 9. Attendance Statement of Peons | | | | | |
| 10. Abstract of Junior Supervisors | | | | | |
| 11. Abstract for Peons | | | | | |
| 12. Posters (in red) giving instructions to candidates | | | | | |
| 13. Asstt. to Sr. Supervisors Bill Forms | | | | | |
| 14. Store Clerks Bill Forms | | | | | |
| 15. Log Table | | | | | |
| 16. Statistical Table | | | | | |
| 17. Drawing Sheets | | | | | |
| 18. Cloth Bags | | | | | |
| 19. Paper Bags | | | | | |
| 20. Senior Supervisor's Bill Forms | | | | | |
| 21. Individual Principal's Bill Forms | | | | | |

Date :

Principal

Name of the College : ......................

Seal

............................

**PLEASE TURN OVER FOR INSTRUCTIONS**

## Instructions

1. The Answer-books and other stationery (Practical papers etc.) should be used only for University Examinations.
2. A separate stock register for stationery should be maintained to keep record of University stationery.
3. As soon as the University Examinations are over the remaining stationery should be Sealed and kept-in a safe custody in Principal's office.
4. The stock verification of the University stationery will be done at any time by the University officials.
5. As a Custodian the Principals of the Colleges should ensure that the stock of the stationery is maintained upto date after every University examination is over.
6. Principal is requested to mention total number of Candidates appearing from his College at the University examination up to date (over leaf).

*for* Registrar

P.U.P.—10,000–12–2005 (12824/Backup~2/Ganesh) [PC-6]